# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/02/2023 (रविवार) दुपार

---

## दुखापत

**१) पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत वार्ड क्र. ०१ खापरखेडा येथे दिनांक १८/०२/२०२३ चे १६.०० वा. ते १६.१५ वा. सुमारास फिर्यादी नामे— सुरेश कालुराम पटेल, वय ६३ वर्षे, रा. त्रिमुर्ती नगर प्लॉट नं. १०८ नागपुर ह. मु. वार्ड क्र. ०१ खापरखेडा याची तब्येत बरी वाटत नसल्याने त्याने घरासमोर राहणारा आरोपी नामे— नितीन बोबडे याला मला बर वाटत नाही, एक दारूची निप आणुन दे असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीस तु मला नालायक व भाडया समजलास का असे बोलुन पुढे मला असे काम सांगायचे नाही म्हणुन फिर्यादी सोबत झगडा भांडण करून शिवीगाळ केली, हातबुक्याने व विटाने फिर्यादीचे तोंडावर मारले त्यामुळे फिर्यादीचे तोंडावर, ओठाला, कमरेला व उजव्या खांदयाला मार लागला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक रेवतकर, ब. नं. १९८७ मो. क्र.९५४५५२३७३६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत वार्ड क्र. १५ गजानन मंदिर कळमेश्वर येथे दिनांक १६/०२/२०२३ चे दूपारी ११.४० वा. सुमारास फिर्यादी नामे— हरीशचंद्र देवीदास मडावी, वय ३१ वर्ष, रा. वार्ड क्र. १५ गजानन मंदिर कळमेश्वर याचे ०८ वर्षा पासून प्रज्ञा अरूण गजभिये हीचे सोबत प्रेम प्रकरण सुरू आहे. दिनांक १६/०२/२०२३ रोजी सकाळी ११.११ वा. फिर्यादीला प्रज्ञा अरूण गजभिये हीचे वडील आरोपी नामे —अरूण गजभिये, रा. कळमेश्वर याने त्यांच्या मोबाईल वरून फोन करून म्हटले की, ‘‘तूझा मोबाईल घेवून जाण्यासाठी माझा घरी ये’’ म्हणून फिर्यादी त्याचे घराकडे ११.४० वा. पोहचले व बाहेरून प्रज्ञा हीला आवाज दिला तेव्हा तिचे वडील अरूण गजभिये हे बाहेर आले, व फिर्यादीला म्हणाले ‘‘माझी मूलगी घरी नाही आणि तूझा मोबाईल सूध्दा माझा घरी नाही’’ असे म्हटले तेव्हा फिर्यादीने त्यांना म्हटले मला कशाला बोलाविले यावरून आरोपी अरूण गजभिये याने त्याच्या घरातून लोखंडी रॉड आणला व फिर्यादीच्या डोक्यावर मारले तसेच फिर्यादीच्या डावे हातावर सूध्दा मारले फिर्यादी खाली पडले व त्याच्या डोक्यातून रक्त निघाले त्यानंतर फिर्यादी आपल्या घरी गेले तेव्हा फिर्यादीला त्यांच्या मित्रांनी ग्रामिण रूग्णालय कळमेश्वर येथे नेले. त्यानंतर रेफर केल्याने मेडीकल कॉलेज नागपूर येथे घेवून गेले फिर्यादी तिथे उपचार करून घरी आले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३२४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं. ५८१ अश्विन मो. क्र. ८६६८७४९८७४ हे करीत आहे.

**३) पो.स्टे. केळवद** :— अंतर्गत नांदोरी येथे दिनांक १८/०२/२०२३ चे २०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— देवेन्द्र उर्फ देवा निंदराज पिंगे, वय ३५ वर्ष, रा. नांदोरी वार्ड क्र ०२ ता. सावनेर हे चौकात महादेव ताजणे यांचे घरासमोर उभे असतांना नमूद आरोपी नामे— १) प्रज्वल सतिश झाडे २) सतिश झाडे दोन्ही रा. नांदोरी यांनी संगनमत करून फिर्यादीस शिवीगाळ करून सिमेंटच्या विटाच्या तुकडयाने व हात भूक्कीने डोक्यावर, कानावर मारून जखमी केले व पाहून घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार रामराव पवार ब. नं. ७७१ मो. नं. ७८७५९८३३६० हे करीत आहे.

**४) पो.स्टे. खापा** :— अंतर्गत १४ किमी अंतरावर मौजा बिच्छवा येथे दिनांक १८/०२/२०२३ चे १७.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— सौ. अनिता शंकररावजी मसराम, वय ३७ वर्ष, रा. बिच्छवा ता. सावनेर व फिर्यादीची मुलगी ही घरा बाहेर हजर असता यातील आरोपी क्र. १) नामे— सौ. प्रेमिला भिमराव पाटील व आरोपी क्र. २) नामे—२) जयभिम भोशराव बागडे दोन्ही रा. बिच्छवा ता. सावनेर यांनी संगनमत करून ''तु माझे दारूच्या धंदया बदल का बदनामी करीत आहे'' या कारणा वरून फिर्यादी व फिर्यादीचे मुलीला शिवीगाळी केली आरोपी क्र १ हिने आपल्या हातात लाकडी काठी घेवून लाकडी काठीने फिर्यादीचे पाठीवर मारून जखमी केले व पुन्हा पाहून घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादंवि कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार बंन्सोड ब. नं ४६३ पोस्टे खापा मो. नं ९९२३४१०२२३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**